मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरात एकदाही कर न भरलेले 34 हजार मालमत्ताधारक!

## चालू आर्थिक वर्षात 4 लाखांहून अधिक नागरिकांनी भरला मालमत्ता कर!

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात ज्या निवासी किंवा बिगरनिवासी मालमत्ताधारकांकडे थकबाकी आहे, अशा मालमत्ताधारकांवर महापालिका कठोर कारवाई करण्यास सुरुवात करणार आहे. शहरात ७ लाख ३१ हजार मिळकतींची नोंद आहे. त्यापैकी आतापर्यंत ४ लाख २६ हजार मालमत्ताधारकांनी चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा केला आहे. तसेच, आतापर्यंत एकदाही मालमत्ता कर न भरलेली ३४ हजार २२ इतकी संख्या असून, अशा मालमत्ताधारकांवर महापालिका कठोर कारवाईस सुरुवात करणार असल्याचे कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.




महापालिकेने पहिल्या तिमाहीत ५२२ कोटींचे कर वसूल करून विक्रम केला आहे. चालू आर्थिक वर्षात कर संकलन विभागाने १३०० कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी महापालिकेच्या १८ विभागीय कार्यालयांमार्फत कर संकलनाचे कामकाज सुरू आहे.

1. शहरात ५० हजारांपेक्षा अधिक थकबाकी असणाऱ्यांची संख्या : २८ हजार ५१८

2. एक लाखांहून अधिक थकीत असणाऱ्या मालमत्तांची संख्या : ९ हजार १४७

3. पाच लाखांपेक्षा अधिक थकबाकी असणाऱ्या व्यावसायिक मालमत्तांची संख्या : ८७५

ऑनलाइन मालमत्ता कर भरणाऱ्यांना मिळणार ४ टक्के सवलत!

पिंपरी चिंचवड महापालिकेचा मालमत्ता कर १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ याकाळात ऑनलाइन भरल्यास मालमत्ताधारकांना सामान्य करावर ४ टक्के सवलत मिळणार आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तात्काळ तो भरून या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

### थकबाकीदारांना बजावण्यात आली नोटीस

» मालमत्ता बिलासोबत थकबाकीदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. नोटीस देऊनही वारंवार मालमत्ता कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्यांवर महापालिकेने कठोर पावलं उचलली आहेत. कर न भरल्यास मालमत्ताही जप्त करण्याचे उद्दिष्ट असल्याचे कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे. तात्काळ कर न भरल्यास कारवाई अटळ असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. शहरातील थकीत १ लाख १२ हजार ८०९ निवासी मालमत्ताधारकांकडे ३१० कोटींचा थकीत कर आहे. ज्या निवासी मालमत्ताधारकांकडे ५ किंवा १० वर्षांपेक्षा अधिक काळापासून थकबाकी आहे, अशा निवासी मालमत्तांची जंगम मालमत्ता म्हणजे कार, टीव्ही, फ्रिज व घरातील महागड्या वस्तू जप्त करण्याची कारवाई महापालिकेच्या कर संकलन विभागाच्या मार्फत करण्यात येणार आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये महा रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद!

## एकाचवेळी शहरातील 30 ठिकाणी शिबिरे, 2321 रक्त पिशव्यांचे विक्रमी संकलन

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड शहरात दि.२२ जुलै रोजी आयोजित ३० भव्य महा रक्तदान शिबिरांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भाजप शहर जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

शत्रुघ्न काटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या शिबिरांमधून एकूण २३२१ रक्त पिशव्यांचे विक्रमी संकलन करण्यात आले.

आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात विविध ठिकाणी रक्तदान शिबीरे घेण्यात आली. यावेळी माजी आमदार श्रीमती अश्विनीताई जगताप, दक्षिण आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, भाजपा सरचिटणीस विजय शिंदे, अजय पताडे, महिला शहराध्यक्ष सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, मंडल अध्यक्ष मोहन राऊत, हर्षद नढे, सोमनाथ तापकीर, गणेश ढोरे, सनी बारणे, जयदीप खापरे, धरम वाघमारे, मंगेश धाडगे, अनिता वाळुंजकर, रामदास कुटे, ॲड. योगेश सोनवणे, शिवराज लांडगे, अमोल डोळस, अजित बुर्डे यांच्यासह स्थानिक नगरसेवक, भाजप पदाधिकारी, विविध प्रकोष्ठ प्रमुख उपस्थित होते.



शत्रुघ्न काटे यांनी शहरातील नागरिकांना आणि युवकांना या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग घेण्याचे आवाहन केले होते आणि त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. या शिबिरांमध्ये महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिक अशा समाजातील सर्वच स्तरांतील लोकांनी उत्साहाने सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले.

ही रक्तदान शिबिरे चिंचवड, पिंपरी आणि भोसरी विधानसभा क्षेत्रातील विविध प्रमुख ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये रावेत – वाल्हेकर वाडी, चिंचवड, काळेवाडी, थेरगाव – वाकड, थेरगाव चौक, रहाटणी – पिंपळे सौदागर, रहाटणी, सांगवी – पिंपळे गुरव, पिंपळे गुरव, प्राधिकरण – चिंचवड, आकुर्डी गाव – शाहू नगर, सं.तु.नगर – खराळवाडी – कासारवाडी, फुगेवाडी – दापोडी – बोपखेल, चिखली – कृष्णानगर, रुपीनगर, तळवडे – यमुनानगर, मोशी – चहोली, चहोली बुद्रुक, दिघी – गवळीनगर गव्हाणे वस्ती, लांडगे वस्ती आणि मोशी प्राधिकरण, नेहरूनगर या ठिकाणांचा समावेश होता. तिन्ही विधानसभा संघातील भारतीय जनता पार्टी मंडल अध्यक्ष, विविध पदाधिकारी तसेच अन्य सामाजिक संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी झाला.

यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे यांनी “रक्तदान हीच खरी समाजसेवा असून, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या समाजाभिमुख कार्याला मानवंदना म्हणून आपण सर्वांनी या उपक्रमात सहभागी व्हावे. प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे, आणि प्रत्येक रक्तदाता ही प्रेरणा आहे!” असे आवाहन पिंपरी चिंचवड शहरवासियांना केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. यामध्ये विशेषतः तरुणाईचा सहभाग लक्षणीय होता, तर महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनीही मागे न राहता या सामाजिक कार्यात सक्रिय योगदान दिले.

# कार्यकारी सोसायट्यांना राज्य सहकारी बँकेचे पाठबळ

## कर्जपुरवठ्याअभावी शेतकरी अडचणीत सापडल्याने शेतकऱ्यांना मदत करा; राज्यमंत्री मोहोळ

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील ३१ जिल्हा सहकारी बँकांपैकी काही बँका अडचणीत असल्याने किंवा त्या बंद असल्यामुळे राज्य सहकारी बँकेने थेट विविध कार्यकारी सोसायट्यांना वित्तपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणीही सुरू झाली असून, राज्यातील हजारो सेवा सोसायट्यांना दिलासा मिळणार आहे.



राज्यातील ३१ जिल्हा सहकारी बँकांपैकी काही बँका अडचणीत आहेत किंवा बंद असल्यामुळे या जिल्ह्यातील विविध कार्यकारी सोसायट्यांना जिल्हा बँकेकडून होणारा वित्तपुरवठा बंद झाला आहे. आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या किंवा बंद पडलेल्या काही जिल्हा बँकांमधून विविध कार्यकारी सोसायट्यांना वित्तपुरवठा होत नव्हता. त्यामुळे अनेक गावांतील शेतकऱ्यांना हंगामासाठी कर्ज मिळू शकत नव्हते. हंगामासाठी पैसे हवे असतील, तर इतर पर्यायांचा अवलंब करावा लागत असल्याची बाब शेतकऱ्यांनी आणि संस्थांनी राज्यमंत्री मोहोळ यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

कर्जपुरवठ्याअभावी शेतकरी अडचणीत सापडल्याने शेतकऱ्यांना मदत करण्याची सूचना केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला केली होती. त्यानुसार राज्य सहकारी बँकेने थेट विविध कार्यकारी सोसायट्यांना वित्तपुरवठा करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, या नियमांतील बदलामुळे विविध कार्यकारी सोसायट्यांनाही काही निकष पाळून वित्तपुरवठ्याबाबत राज्य सहकारी बँकेशी संपर्क साधण्याचे आवाहन बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी केले आहे.

ज्या विविध कार्यकारी सोसायट्या गेली तीन वर्षे नफ्यात आहेत, ज्यांचा एनपीए १० टक्क्यांपेक्षा कमी आहे आणि ज्या आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, अशा सोसायट्यांना थेट राज्य सहकारी बँकेकडून वित्तपुरवठा होणार आहे. राज्यात एकूण २१ हजार विविध कार्यकारी सोसायट्या आहेत. या सोसायट्यांमार्फत खरीप आणि रब्बी हंगामासाठी वित्तपुरवठा करण्यात येणार आहे.

> “ ज्या जिल्हा बँका अडचणीत आहेत, त्या बँकांच्या कार्यक्षेत्रातील सेवा सहकारी सोसायट्यांना शिखर बँकेतून थेट कर्जपुरवठा करण्याच्या सूचना दिल्या आहेत, ज्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे. गावची सोसायटी सक्षम असेल, तर गावचे अर्थकारणही सक्षम असते. त्यासाठी सोसायट्यांना कर्जपुरवठा करण्याच्या सूचना केली होती.
>
> **– मुरलीधर मोहोळ, केंद्रीय सहकार राज्यमंत्री.**

# क्यूआर कोड स्कॅन करा; व्हीआयपी दर्शन घ्या!

## व्हीआयपी दर्शनावरून होणारा वाद टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने क्यूआर कोडचा पर्याय निवडला

**पुणे | प्रतिनिधी**

श्रावण महिन्यामध्ये श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे होणारी गर्दी आणि व्हीआयपी दर्शनावरून होणारा वाद टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने क्यूआर कोडचा पर्याय निवडला आहे. भाविकांना क्यू आर कोडच्या माध्यमातून व्ही. आय.पी. दर्शन सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.



जिल्हाधिकारी कार्यालय येथे श्रावणी सोमवार यात्रा नियोजन बाबत आढावा बैठक, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला. भीमाशंकर देवस्थान अध्यक्ष अॅड. सुरेश कौदरे, व्यवस्थापक चंद्रकांत कौदरे, प्रशासकीय व्यवस्थापक प्रमोद शिर्के, सह-कार्यकारी विश्वस्त मधुकर गवांदे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, जुन्नरचे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, खेडचे तहसिलदार प्रशांत बेढ्रे, आंबेगावचे तहसीलदार संजय नागटिळक व अन्य विभागाचे संबधीत अधिकारी उपस्थित होते.

श्री क्षेत्र भीमाशंकरला श्रावण महिन्यात येत्या सोमवारपासून दर्शनासाठी येणाऱ्या भावीकांची मोठी गर्दी लक्षात घेता एक रांग व्ही. आय.पी. दर्शन व दुसरी साधी दर्शन रांग अशा दोन रांगेत दर्शन घेता येईल अशी व्यवस्था करावी. तसेच दर्शन, पुजा करण्यासाठी निश्चित टप्पा तयार करावे. वाहनतळाची ठिकाणे पोलिस विभागाने निश्चित करून त्या ठिकाणी चार्जिंगची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. वन विभागानेही पाहणी करुन रस्त्यातील अडथळे दुर करावेत. भाविकांची गैरसोय होवू नये व त्यांना चांगल्या सुविधा देता याव्यात. यासाठी प्रत्येक विभागाने नियोजन करुन दक्ष राहण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या.

या कामास प्राधन्य देवून येत्या रविवार पर्यंत सर्व कामे पूर्ण करावीत. तसेच मंदिर परिसर, भिमाशंकर गाव, मंचर या ठिकाणी क्यूआर कोड बाबत माहिती देणारे फलक लावण्यात यावेत. क्यूआर कोडच्या माध्यमातून व्ही.आय.पी. दर्शन सुविधा उपलब्ध करुन द्यावी. तसेच क्यूआर कोडद्वारे मंदीर संस्थानमार्फत भाविकांना देण्यात येणाऱ्या सर्व सुविधांची माहिती उपलब्ध होईल त्या दृष्टीने व्यवस्था करावी, असे डुडी सांगितले.

### भीमाशंकरचा तीर्थक्षेत्र आराखडा

**» दरम्यान कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकरचा पर्यटन आराखडाही जिल्हा प्रशासनाकडून तयार करण्यात आला आहे. बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असेल्या भीमाशंकरच्या (ता. आंबेगाव) विकास आराखड्याची अंमलबजावणी तातडीने सुरू करून कुंभमेळ्याच्या आधी या क्षेत्राचा सुनियोजितपणे दर्जेदार विकास करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहे. हा आराखडा २८८ कोटींचा असून इको टुरिझम वाहतूक आणि सुरक्षा सुविधांचा दर्जा उंचविण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच भीमाशंकर येथील दळणवळण सुविधा, वाहतूक मार्ग, अंतर्गत रस्ते यांच्या विकासास प्राधान्य देण्यात येणार आहे. याठिकाणी हेलीपॅड सुविधा उपलब्ध करून देण्याचेही नियोजन असून परिसराचा विकास करताना स्थानिक व्यावसायिक, दुकानदारांना नवीन दुकाने उपलब्ध करून देण्याची सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.**

# अद्यापही कामे सुरूच; मेट्रोच्या कासवगती कामामुळे चालकांकडून संताप

## कामासाठी वारंवार त्या मार्गावरील वाहतूक बंद केली जात असल्याने वाहनचालकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी ते फुगेवाडी या मार्गावर मेट्रो सुरू होऊन तीन वर्षे झाली आहेत. मेट्रोतून प्रवासाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. असे असताना पिंपरी व कासारवाडी येथे मेट्रो स्टेशनचे काम अद्याप कासव गतीने सुरूच आहे. या कामासाठी वारंवार त्या मार्गावरील वाहतूक बंद केली जात असल्याने वाहनचालकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

मेट्रो मार्गिका आणि स्टेशनचे प्रत्यक्ष काम पिंपरी-चिंचवड शहरात सन 2017 ला सुरू झाले. पहिला पिलर 25 ऑक्टोबर 2017 ला शंकरवाडी येथे उभा करण्यात आला. संत तुकारामनगर मेट्रो स्टेशन सर्वात प्रथम तयार झाले. शहरात मेट्रोचे डबे 29 डिसेंबर 2019 ला दाखल झाले. सर्व काम पूर्ण झाल्यानंतर कमिशनर ऑफ मेट्रो रेल्वे सेफ्टीची (सीएमआरएस) परवानी 6 जानेवारी 2022 ला मिळाली.

त्यानंतर पिंपरी ते फुगेवाडी असे. 5.8 किलोमीटर अंतरावर मेट्रो धावू लागली. सुरूवातीला केवळ कुतूहल म्हणून नागरिक मेट्रोचा प्रवास करीत होते. आता, पिंपरी-चिंचवड आणि पुणे या दोन्ही मेट्रो मार्गावर सर्वाधिक विक्रमी महसूल पिंपरी स्टेशन येथून मिळत आहे. पिंपरी स्टेशनसह इतर स्टेशनवरून प्रवास करण्यास नागरिक मोठी पसंती देत आहेत.



### वाहतुकीस अडथळा होऊ नये याची दक्षता घ्यावी

» वाहतुकीस अडथळा होणार नाही, याची खबरदारी घेऊन काम पूर्ण करण्यास महामेट्रो प्रशासनाला सांगण्यात आले आहेत. तसेच, वाहनचालकांची गैरसोय होणार नाही, तसेच, सुरक्षेकडे लक्ष देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाचे सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड यांनी सांगितले आहे.

असे असले, तरी अद्याप मेट्रोची कामे काही संपता संपत नाहीत. मेट्रो सुरू होऊन तीन वर्षे लोटली तरी, मेट्रो स्टेशनची अनेक कामे प्रलंबित आहेत किंवा रखडली आहेत. पुणे शहराच्या तुलनेत पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी, संत तुकाराम नगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी व दापोडी हे सर्व सहाही मेट्रो स्टेशन कलात्मक व आकर्षक नसल्याचा आरोप होत आहे. केवळ ठोकळेबाज स्टेशन असल्याने शहरवासीयांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

त्या कासव गतीने काम सुरू असल्याने रोष व्यक्त केला जात आहे. नाशिक फाटा मेट्रो स्टेशन हे शहरातील सर्वात उंचीवरील स्टेशन आहे. तेथील काम अद्याप पूर्ण झाले नसल्याने रात्री हा मार्ग वाहतुकीसाठी वारंवार बंद केला जात आहे. त्यामुळे उर्वरित एका मार्गावर वाहनांची प्रचंड गर्दी होऊन वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे वाहनांच्या लांबपर्यंत रांगा लागत आहेत. या सातत्याच्या कोंडीमुळे वाहनचालक वैतागले आहेत.

तसेच, पिंपरी मेट्रो स्टेशनचेही उर्वरित कामे अजून सुरूच आहेत. कमला क्रास बिल्डिंग येथील स्टेशनच्या चौथ्या जिन्याचे काम सुरू आहे. त्यासाठी बीआरटी मार्ग व सर्व्हिस रस्ता वारंवार बंद केला जात आहे. परिणामी, वाहतूक कोंडी होऊन वाहनचालकांसह पादचाऱ्यांची गैरसोय होत आहे.

### दुभाजक सुशोभीकरणास विलंब

» मेट्रोच्या कामासाठी दापोडी ते निगडी मार्गावर दुभाजक तोडण्यात आले आहेत. ते दुभाजक दुरुस्त करून त्यात झाडे लावण्यात आलेली नाहीत. झाडे लावून सुशोभीकरणाचे काम संथगतीने सुरू आहे. रिकाम्या दुभाजकात दगड, कचरा व झुडपे वाढल्याने परिसर विद्रूप दिसत आहे.

### स्टेशनची उर्वरित कामे पूर्ण करण्यात भर

» मेट्रो स्टेशनची सर्व कामे झाली आहेत. परवानगी न मिळाल्याने तसेच, इतर कारणामुंळे काही प्रलंबित कामे होती. ती उर्वरित कामे वेगात पूर्ण करण्यात येत आहेत. रस्त्यावर काम करायचे असल्याचे सुरक्षा म्हणून वाहतूक बंद केली जाते. वर्दळ कमी झाल्यानंतर रात्री अकरानंतर रस्ते बंद केले जातात. काम झाल्यानंतर पुन्हा रस्ता खुला केला जातो, असे महामेट्रोचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत सोनवणे यांनी सांगितले.

# आयुक्तांनी अधिका-यांना घेतले फैलावर; स्थायी सभेत सुनावले खडेबोल

## महानगरपालिकेत नागरिकांना भेटीच्या वेळेत गैरहजर, थेट कारणे दाखवा नोटीस

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिकेत नागरिकांच्या भेटीच्या वेळेस आयुक्त गैरहजर असतील तर वरिष्ठ अधिकारी हे सतत गैरहजर राहत आहेत. याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मंगळवारी झालेल्या स्थायी सभेत अतिरिक्त आयुक्ता सह सर्व विभाग प्रमुखांना फैलावर घेत खडेबोल सुनावले.

प्रत्येकाला लहान मुलांसारखे सांगायचे का?, कोणी, कधीही येते, कधीही जाते, अशा शब्दांत विभाग प्रमुखावर संताप व्यक्त केला. तसेच यापुढे कार्यालयीन वेळेत गैरहजर असाल, तर कारणे दाखवा नोटीस देण्यात येईल,




असा इशारा आयुक्त सिंह यांनी दिला. त्यामुळे कार्यालय सोडणा-या अधिका-याचे धाबे दणाणले आहेत.

याबाबत नागरिकांच्या तक्रारींमुळे आयुक्त शेखर सिंह यांनी नागरिकांना भेटण्यासाठी सोमवार, बुधवार आणि शुक्रवार हे तीन दिवस दुपारी तीन ते सहा ही वेळ निश्चित केली. त्यानुसार कार्यालयात नागरिकांसाठी उपलब्ध राहण्याचे निर्देश दिले.

मात्र, सोमवारी (दि.21) आयुक्त सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, विजयकुमार खोराटे यांच्यासह अन्य काही विभागाचे विभाग प्रमुख महापालिकेत उपस्थित नव्हते.

याबाबत वृत्त प्रसिध्द होताच त्याची दखल घेत आयुक्त सिंह यांनी मंगळवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत अति वरिष्ठ अधिका-यांसह सर्व अधिका-यांना खडेबाल सुनावत चांगलेच फैलावर घेतले होते.

आयुक्त सिंह म्हणाले, मी महापालिका मुख्यालय किंवा शहराबाहेर जाताना नगरविकास विभागाच्या सचिवांना कळवितो. तुम्हाला कळविण्यास काय हरकत आहे. त्यामुळे कार्यालयीन वेळेत गैरहजर राहिल्यास अति वरिष्ठ अधिकारी असला तरी कारणे दाखवा नोटीस काढून कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्त सिंह यांनी दिल्याचे सुत्रांनी सांगितले.

### भेटण्यासाठी नागरिकांचे हेलपाटे

» महापालिकेचे कार्यालयीन कामकाज सकाळी दहा ते सायंकाळी पावणेसहापर्यंत सुरु असते. या वेळेत विविध कामानिमित्त शेकडो नागरिक महापालिकेच्या विविध कार्यालयात, वरिष्ठ अधिका-यांकडे येत असतात. परंतु, अधिकारी कार्यालयात गैरहजर असल्याने त्यांना भेटण्यासाठी नागरिकांना हेलपाटे मारावे लागत आहे. अधिका-यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांकडून ते साईटवर, बैठकीला किंवा कार्यक्रमाला असल्याचे कारण दिले जाते.

# सणसवाडी- कोरेगाव भीमा गटात राजकीय वारे

## इच्छुकांच्या आखाडपार्टीने चर्चा : झेडपीच्या गट रचनेनंतर हवा तापली

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर- हवेली विधानसभा मतदारसंघातील सर्वाधिक संवेदनशील असलेल्या सणसवाडी- कोरेगाव भीमा जिल्हा परिषद गटात आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. इच्छुक उमेदवारांनी मतदारांना आकर्षित करण्यासाठी आखाड पार्टीचे नियोजन केल्याने इच्छुकांसह या गटाची जिल्हाभर चर्चा रंगली आहे. गट- गण पुनर्रचनेनंतर राजकीय वारे वाहू लागली असून हवा तापली आहे.

आरक्षणाच्या मुद्द्यावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्याने अनेक दिवस इच्छुकांनी खर्चाला हात आखडता घेतला असला तरी आता मात्र सध्यातरी पक्ष श्रेष्ठींना खुश करीत अधिकृत उमेदवारी आपल्यालाच मिळावी यासाठी आखाडाच्या रूपाने चालत आलेल्या संधीचे इच्छुक सोने करण्यासाठी धडपड करीत आहे. त्यांच्याकडून वातावरणनिर्मिती, उमेदवारी ते निकालापर्यंतची रणनिती आखली जात आहे.

नव्याने तयार झालेल्या सणसवाडी- कोरेगाव भीमा जिल्हा परिषद गटात भाजपकडून शिरूर तालुका भाजप अध्यक्ष जयेश शिंदे, डिंग्रजवाडीचे माजी सरपंच राहुल गव्हाणे, राष्ट्रवादी (अजित पवार गट) मधून शिरूर पंचायत समितीच्या माजी सभापती मोनिका हरगुडे, श्रीक्षेत्र वढूचे माजी सरपंच प्रफुल्ल शिवले, राष्ट्रवादी (शरद पवार गट) मधून सणसवाडीचे माजी सरपंच, शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक दत्तात्रय हरगुडे हे इच्छुक आहेत.



### राहुल गव्हाणे हे समाजसेवेतून लोकांशी कनेक्ट

» प्रतिष्ठितेच्या समजल्या जाणाऱ्या निवडणुकीस भाजपाकडून डिंग्रजवाडीचे माजी सरपंच राहुल गव्हाणे हे देखील इच्छुक आहेत. २०१२ मध्ये पंचायत समितीसाठी तीव्र इच्छुक असलेल्या राहुल गव्हाणे यांनी निवडणुकीत माघार घेत आपल्या सहकाऱ्यांना संधी दिली होती तद्नंतर आजतागायत तालुक्याच्या राजकारणात सर्वांना सोबत घेत समाजसेवा करणारा निर्मळ मनाचा नेता म्हणून राहुल गव्हाणे यांची ओळख आहे. मतदारसंघात असलेला नातेवाईकांचा मोठा गोतावळा, तालुक्याच्या राजकारणात डिंग्रजवाडी गावची असलेली एकी यामुळेच मनमिळावू स्वभावाच्या राहुल गव्हाणे यांच्यासाठी त्यांच्या कार्यकर्त्यांनी मतदारसंघ पिंजून काढला आहे.

### भाजपचे जयेश शिंदे ॲक्टिव्ह

» शिरूर तालुक्याचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या सणसवाडी-कोरेगाव भीमा जिल्हा परिषद गटाची निवडणूक प्रतिष्ठेची निवडणूक झाली आहे. या गटामध्ये भाजपामधून इच्छुक असलेल्या जयेश शिंदे यांनी पहिल्यापासून रक्तदान शिबीर, महाआरोग्य शिबीर, शेतकऱ्यांसाठी शेतीपयोगी साहित्य वाटप, अपंगासाठी साहित्य वाटप, तलाठी कार्यालयापासून मंत्रालयापर्यंत नागरिकांचे प्रत्येक प्रश्न सोडवण्यासाठी कायम प्रयत्न करीत आहेत. देशात आणि राज्यात भाजपाची सत्ता असल्याने जयेश शिंदे यांचे पक्षश्रेष्ठी आणि मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यासोबत थेट संपर्क असल्याने नागरिकांमध्ये जयेश शिंदे यांचे नाव चर्चेत आहे.

### मोनिका हरगुडे यांना दांडगा अनुभव

» दुसरीकडे याच जिल्हा परिषद गटातून पंचायत समितीची निवडणूक लढवत सभापती झालेल्या मोनिका हरगुडे यांनी मागील पाच वर्षात आपल्या गणामध्ये कोट्यवधींची विकासकामे आणली आहेत. गणातील नागरिकांच्या सुख- दुःखात कायम हजेरी लावत महिला वर्गासह स्थानिक मतदारांच्या मनात आपल्याबद्दलची आपुलकी टिकवून ठेवली आहे. मोनिका हरगुडे यांनी यापूर्वी शिरूर पंचायत समितीचे उपसभापती, सभापती पदाचा कार्यकाळ पूर्ण केला असल्याने त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेचा दांडगा अनुभव आहे. त्यामुळे या गटात त्यांचे नाव मतदारापर्यंत पोहोचले आहे.

# वनपुरीवासीय आक्रमक; सिटी सर्व्हेचा कॅम्पच रद्द

## ग्रामपंचायत, भूमी अभिलेख विभागाकडून लोकांची दिशाभूल केल्याचा आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

वनपुरी (ता. पुरंदर) गावामध्ये 2022-23 मध्ये ड्रोनच्या माध्यमातून सर्व्हे करण्यात आला. त्यानंतर भूमी अभिलेख विभागाने सनद तयार करताना अत्यंत चुकीच्या पद्धतीने केल्या आहेत. अनेक ठिकाणी सामान्य नागरिकांची घरे बांधलेली असताना त्याची नोंद न करता ग्रामपंचायत असे दाखविण्यात आले आहे. काही ठिकाणी मोकळ्या असताना तिथे ग्रामपंचायत सदरी नोंद करण्याऐवजी ठराविक राजकीय लोकांची जाणीवपूर्वक नोंद केलेली आहे. त्यामुळे भूमी अभिलेख विभागाने तात्पुरती दुरुस्ती न करता नव्याने सर्व्हे करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली असून ग्रामस्थांच्या आक्रमतेमुळे बुधवारी (दि. 23) प्रशासनाने सिटी सर्व्हेचा कॅम्पच रद्द केला आहे.

वनपुरी येथील गावठाणमधील सर्व्हेबाबत मोठ्या प्रमाणात चुका असून ग्रामपंचायत व भूमी अभिलेख विभागाकडून लोकांची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप करून नागरिकांनी गावचा सर्व्हे नव्याने करण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी वेळोवेळी भूमी अभिलेख विभागाकडे पुराव्यासह मागणी केली आहे. मागील दोन वर्षांपासून तालुका भूमी अभिलेख कार्यालय, जिल्हा अधिकारी कार्यालय, आमदार विजय शिवतारे यांना वेळोवेळी निवेदने देवून सर्व्हे करण्याची मागणी केली होती.



भूमी अभिलेख विभागाने वनपुरीमध्ये कॅम्प आयोजित केला होता. भूमी अभिलेख विभागाचे शिरस्तदार संजय पवार, परिरक्षण भूमापक विकास ढेकळे, भुकरमापक विष्णू सोनटक्के, दप्तरबंद राजेंद्र चिंचकर आदी अधिकारी उपस्थित होते.

### पदाधिकाऱ्यांकडून पदांचा गैरवापर?

» दोन दिवसांपूर्वीच तालुका भूमी अभिलेख विभागाला ग्रामस्थांच्या वतीने निवेदन दिले आहे. यामध्ये अनेक पदाधिकाऱ्यांनी पदांचा गैरवापर करून गावठाणमधील मोकळ्या जागा स्वतःच्या आणि कुटुंबीयांच्या नावावर करून घेतल्या असल्याची बाब निदर्शनास आणून दिली आहे. त्याविरोधात जाहीरपणे तक्रारी करण्यास नागरिक भीत आहेत.

### नव्याने करण्यात येणारी सनद यावर घ्यावे

» ग्रामपंचायत मधील 8 – अ वर जेवढे क्षेत्र असेल तेच क्षेत्र गावचा नकाशा तसेच नव्याने करण्यात येणारी सनद यावर घ्यावी. तसेच अनेक लोकांनी 8 – अ वर नव्याने चुकीच्या नोंदी केल्या असल्याची शंका असून वर्ष 2000 पूर्वी 8 – अ वरील क्षेत्रा प्रमाणेच नोंदी कराव्यात अशी मागणी केली आहे ग्रामस्थांच्या मागणीनुसार भूमी अभिलेख विभागाने कॅम्प रद्द केल्याचे सांगितले.